श्रीशिवराज्याभिषेकदिनोत्सव सेवा समिती, दुर्गराज रायगड
रजि. क्र. - जी. बी. बी. एस. डी. - ११४१/२००५ / एफ - २९९३४
द्वारा. १६, गुरूकृपा प्रसाद इस्टेट, स्टेशन रोड, टागोर नगर - १ विक्रोळी (पू), मुंबई - ८३.

॥ श्रीशिवराज्याभिषेकदिनोत्सव ॥
ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी

**जावक क्र. VIPL ०४७/०७/२६**
**स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३५३, नि.ज्येष्ठ कृ.१३**
**दिनांक : १२ जुलै २०२६**

**प्रति,**
**मा.श्री.सुधीरजी मुनगंटीवार साहेब**
**आमदार - बल्लारपूर मतदारसंघ**
**यांसी सस्नेह वंदे मातरम !**

**विषय : शिवसन्मान २०२६ या पुरस्काराबाबत**

**मा. महोदय,**

भारताच्या इतिहासाला निर्णायक कलाटणी देत, अनेक शतकांच्या परकीय गुलामगिरीच्या जोखडातून रयतेच्या मनामनांत स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि स्वराज्याची प्रेरणा जागविणारा ऐतिहासिक सोहळा म्हणजे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, आनंदनाम संवत्सर, शके १५९६ या शुभमुहूर्तावर संपन्न झालेला छत्रपती शिवाजी महाराजांचा 'शिवराज्याभिषेक' होय. हिंदुस्थानच्या इतिहासात स्वकर्तृत्व, दूरदृष्टी आणि अद्वितीय नेतृत्वाच्या बळावर एका मराठा राजाने उभारलेली स्वराज्याची व्यवस्था आजही आदर्श शासनपद्धतीचे प्रेरणादायी उदाहरण म्हणून गौरविली जाते.

आपण महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून कार्यरत असताना, ३५०व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने, तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्यास अधिकृत शासकीय सोहळ्याचा दर्जा प्रदान करून त्या ऐतिहासिक परंपरेचा यथोचित गौरव केला. छत्रपती शिवाजी महाराजांविषयीची आपली अढळ निष्ठा आणि असलेली गाढ श्रद्धा महाराष्ट्रातील जनतेच्या मनावर कायमची कोरली गेली असून, त्याबद्दल संपूर्ण महाराष्ट्र सदैव आपला ऋणी राहील.

"बत्तीस मण सुवर्णसिंहासनावर आरूढ होणाऱ्या माझ्या राजाची पालखीही त्या वैभवाला साजेशी असली पाहिजे," या उदात्त भावनेतून आपण शिवराज्याभिषेक समितीस रौप्यमयी पालखी अर्पण केली. आपल्या या उदार दातृत्वाची आणि शिवकार्याप्रती असलेल्या समर्पणाची नोंद शिवराज्याभिषेक समिती सदैव कृतज्ञतापूर्वक स्मरणात ठेवेल.

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपण व्यक्त होणारे विचार हे केवळ भाषण नसून आपल्या अंतःकरणातील श्रद्धेची प्रचिती असते, याची साक्ष संपूर्ण महाराष्ट्राने वेळोवेळी अनुभवली आहे. शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या

संपर्क : सनी ताठेले - ९००४० ०४४४४, रंजन गावडे - ९८७०५ ९९९४०
आपला सोहळा ! आपला अभिमान !!

॥ श्रीशिवराज्याभिषेकदिनोत्सव ॥
ज्येष्ठ शुध्द त्रयोदशी

वर्षपूर्तीनिमित्त आपण प्रतापगडावरील श्री भवानीमातेला अर्पण केलेले रौप्यछत्र हे इतिहासातील परंपरेचे आधुनिक काळातील प्रेरणादायी पुनर्स्मरण ठरले. लोकप्रतिनिधी म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार, वारसा आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा घराघरांत पोहोचविण्याचे आपले कार्य अत्यंत मोलाचे, अनुकरणीय आणि राष्ट्रहिताला समर्पित आहे.

**शिवराज्याभिषेक समितीच्या प्रत्येक उपक्रमामागे आपले सातत्यपूर्ण मार्गदर्शन, सहकार्य आणि भक्कम पाठबळ लाभले आहे. आपल्या या अमूल्य योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने श्री शिवराज्याभिषेक समितीतर्फे आपणास "शिवसन्मान – २०२६" या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्याची आमची मनःपूर्वक इच्छा आहे.**

**तरी, हा सन्मान स्वीकारण्यासाठी आपण आपली संमती प्रदान करावी, ही नम्र व मनःपूर्वक विनंती. आपल्या सकारात्मक प्रतिसादाच्या अपेक्षेसह !**

**आपला विनीत,**

**श्री.सुनील पवार**
**अध्यक्ष**

**कार्यक्रमाचे स्वरूप**
**जागर शिवराज्यभाषेकाचा २०२६**
**दिनांक : १ ऑगस्ट २०२६, शनिवार**
**वेळ : सकाळी ११ ते दुपारी ५**
**स्थळ : स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज पार्क, दादर (प) - २८**